पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

प्रेसनोट दिनांक : २७/०२/२०२४

# गुटख्याची तस्करी करणारा आंतरराज्यीय गुन्हेगार इसरार मन्सुरी इंदोर मधून जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

दिनांक १४/०२/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मुंबई आग्रा महामार्गाने मुंबई बाजूकडे जाणारा गुटख्याचा कंटेनर पकडून सुमारे २१ लाखांचा अवैध गुटखा जप्त केला होता. सदर बाबत इगतपुरी पोलीस ठाणेस गुरनं ३१/२०२४ भादवि कलम ३२८, २७२, २७३, १८८, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात आरोपी नामे १) अमृत भगवान सिंह, रा. वडवेली, पो. हिनौतीया, ता. खिलचीपुर, जि.राजगड, मध्यप्रदेश व २) पुनमचंद होबा चौहाण, रा. सकारगाव, ता.बिकनगाव, जि. खरगोन, मध्यप्रदेश यांना अटक करण्यात आली होती. यातील अटक आरोपीतांकडे नमुद गुन्हयाचे तपासात चौकशी केली असता, गुटख्याची साठवणूक करुन महाराष्ट्र राज्यात तस्करी करणारा मुख्य गुन्हेगार इसरार मन्सुरी मुस्ताक मन्सुरी, रा. इंदोर याचे नाव निष्पन्न झाले होते.

महाराष्ट्र राज्यासह नजीकचे राज्यांमध्ये गुटख्याची मोठया प्रमाणावर तस्करी करणारा मुख्य सुत्रधार इसरार मन्सुरी यास अटक करणेकामी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक इंदोर, राज्य मध्यप्रदेश येथे रवाना करण्यात आले होते. त्याप्रमाणे पोलीस पथकाने इंदोर शहरातील राऊ परिसरात रात्रभर पाळत ठेवून गुटखा माफिया **इसरार मन्सुरी मुस्ताक मन्सुरी, वय ३५, रा. श्रमिक कॉलनी, राऊ, इंदोर, मध्यप्रदेश** यास शिताफीने ताब्यात घेतले. सदर आरोपीस ताब्यात घेऊन इगतपुरी पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्याची ०१ मार्च पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. सदर गुन्हयाचा तपास इगतपुरी पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सूचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, पोलीस उपनिरीक्षक श्री. संदिप पाटील, पोहवा चेतन संवस्तरकर, पोना योगेश कोळी, गिरीष बागुल, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम तसेच इगतपुरी पो.स्टे. च्या पोउनि कांचन भोजने, पोहवा योगश भावनाथ, पोकॉ प्रकाश कासार यांचे पथकाने गुटखा माफीया इसरार मन्सुरी यास अटक केली आहे.

आरोपी इसरार मन्सुरी हा इंदोर, मध्यप्रदेश येथे गुटख्याची साठवणूक करुन, बंद कंटेनरमध्ये गुटखा लपवून गुटख्याची विविध राज्यांमध्ये चोरटी तस्करी करत होता. सदर गुटखा माफिया हा ब-याच दिवसांपासून पोलीसांच्या नजरेआड गुटखा तस्करी करत होता. त्यास अटक केल्याने राज्यातील अवैध गुटखा नेटवर्कची पाळे-मूळे खोदण्यास पोलीसांना यश येईल.